राज्यातील १३८ जलदगती न्यायालयांसाठी न्यायाधीशांच्या उपलब्धतेसाठी उच्च न्यायालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 2

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान मंदिरात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी घेतले दर्शन >> पान 3

प्रशासनाच्या सोयीपेक्षा जनतेची सोय महत्त्वाची >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

सुविचार

माणसाने आपल्या भरवंशावर जगावे.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 05 ■ बुधवार, दि. 08 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




क्वीन २ वर कोर्टाची टांगती तलवार; कंगना रणौतच्या चित्रपटा विरोधात २५० कोटींचा दावा

आतील पान

## तेलंगणातील पोलीस अधिकाऱ्याने जमवले तब्बल 300 कोटींचे घबाड!

हैदराबाद : तेलंगणातून एक धक्कादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. आपल्या पदाचा गैरवापर करून तब्बल ३०० कोटी रुपयांची बेकायदेशीर म ालमत्ता जमवल्याप्रकरणी तेलंगणाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं एका बड्या पोलीस अधिकाऱ्याला अटक केली आहे. संकिरेड्डी भीम रेड्डी असे अटक करण्यात आलेल्या उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याचं नाव आहे. डीएसपी भीम रेड्डी हे सध्या हैदराबाद येथील पोलीस कॉम्प्युटर सर्व्हिसेस विभागात कार्यरत होते. एसीबीच्या पथकाने त्यांच्या इब्राहिमबाग येथील 'वेसेला मेडोज' या आलिशान निवासस्थानातून सोमवारी संध्याकाळी त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर बेहिशोबी मालमत्ता गोळा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना विशेष एसीबी न्यायालयात हजर केले जाणार आहे.

## पूरग्रस्तांना तातडीने मदत, एकाही नुकसानग्रस्ताला वंचित ठेवणार नाही मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर : राज्यातील पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासन हायअलर्टवर असून, पूरग्रस्तांना तातडीने मदत पोहचवली जाईल. कोणत्याही नुकसानग्रस्ताला मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांची बैठक घेऊन जीवितहानी टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. म हसूलमंत्री बावनकुळे यांनी आज नागपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधत राज्यातील पूरपरिस्थिती, दीक्षाभूमी विकास आराखडा, २२ जुलै रोजीचे महाअभियान आणि राजकीय मुद्द्यांवर सविस्तर भूमिका मांडली.

## लखनऊमध्ये धक्कादायक घटना! आईच्या प्रियकराकडून ६ वर्षांच्या निष्पाप मुलाची हत्या; आईवरही एफआयआर

लखनऊ : लखनऊमध्ये आईच्या प्रियकराकडून ६ वर्षांच्या मुलाची लाथा-बुक्क्यांनी आणि लोखंडी पळीने मारहाण करून हत्या करण्यात आली. आरोपी आणि मुलाच्या आईची सोशल मीडियावर ओळख झाल्यानंतर त्यांच्यात अनैतिक संबंध होते. त्या दोघांमध्ये मुलाचा अडथळा निर्माण होत असल्यानं आरोपीने हे कृत्य केल्याचे पोलिसांनी सांगितले. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी आरोपी प्रशांत सिंग उर्फ गौरव सिंग (२६ वर्ष) याला सोमवारी अटक केली असून हत्येच्या दुसऱ्या दिवशी पळी हस्तगत केली आहे. मृत मुलाची आई पूनम देवी हिचेही नाव एफआयआरम ध्ये नमूद केले आहे.




# राज्यात पुढील पाच दिवस वादळी पावसाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन**

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई वेधशाळेने राज्यासाठी पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, विविध भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.७ जुलै रोजी पालघर, नाशिक घाट आणि पुणे घाट परिसरासाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे.

७ जुलै रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूरघाट,अहिल्यानगर, धुलेजळगाव, वाशीम आणि वर्धा, नागपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर ठाणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, बुलडाणा, अकोला, सातारा घाट आणि अमरावती येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

८ जुलै रोजी पालघर, नाशिक घाट, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर घाट, बुलडाणा, अकोला, अमरावती आणि वर्धा येथे यलो अलर्ट राहणार असून, पुणे घाट आणि सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट असेल.



९ जुलै रोजी रत्नागिरी, सातारा घाट, पुणे घाट, खंडाळा घाट, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.

१० जुलै रोजी वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट कायम राहणार आहे. ११ जुलै रोजी अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.

मुंबई वेधशाळेने नागरिकांनी स्थानिक प्रशासन व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

# वायनाडमध्ये प्रचंड भूस्खलन

**तीन जणांचा मृत्यू सात बेपत्ता, व्हिडीओ पाहून येईल अंगावर काटा!**

**वायनाड/वृत्तसंस्था :** केरळमध्ये आज झालेल्या मुसळधार पावसाने प्रचंड भूस्खलन झाले आहे. मेप्पडीजवळच्या कल्लाडी येथे ही घटना घडली असून यामध्ये तिन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, सात जण बेपत्ता आहेत, हे भूस्खन होत असतानाचे सीसीटीव्ही समोर आले असून हा भीषण व्हिडीओ पाहून अंगावर काटा येतो. या घसरत आलेल्या मातीच्या दाबाने एक ट्रक खेळण्यातील वाहनाप्रमाणे घसरत येताना दिसत आहे. काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांचा लोकसभा मतदारसंघ असलेल्या वायनाडमध्ये ही नैसर्गिक आपत्ती ओढवली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की कल्लाडी बोगद्याच्या बांधकाम स्थळावरील उत्खननादरम्यान साचलेला मलबा खाली कोसळला. मीनाक्षी पुलाजवळ ही भूस्खलनाची घटना घडली. येथे प्रस्तावित वायनाड-मलप्पुरम बोगदा रस्ता प्रकल्पाचे बांधकाम सुरू होते. कालपासून या ठिकाणी काम थांबवण्यात आले होते.गेल्या २४ तासांत या परिसरात २६५ मिमी पावसाची नोंद झाली आहे यामुळे हे भूस्खलन झाले आहे. या घटनेत पाच जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. परिसरात फिरणारे लोक भूस्खलनात सापडल्याचे व्हिडीओत दिसत आहे.

केरळ राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (केएसडीएमए) म्हणण्यानुसार, या मातीच्या



ढिगाऱ्याखाली अजून काही लोक अजूनही गाडले असल्याची शक्यता आहे. तसेच या मातीच्या लोढ्यांत एक चर्च, एक चहाची टपरी आणि बसस्थानक गाडले गेल्याची माहिती समोर आली आहे अग्निशमन आणि बचाव सेवा कर्मचारी, पोलीस आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण दल च्या टीम घटनास्थळी पोहोचल्या असून त्यांनी बचाव कार्य सुरु केले आहे.

**अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी बचावकार्य सुरु – प्रियंका गांधी**

'भूस्खलनात अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. मुख्यमंत्री व्ही.डी. सठेसन स्वतः मदतकार्यावर लक्ष ठेवून आहेत. पोलिस आणि एनडीआरएफची टीम काही काळ घटनास्थळी हजर होती आणि एसडीआरएफ टीम आणि नागरी संरक्षण कर्मचारीही तिथे पोहोचले आहेत. अशी माहिती वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी यांनी दिली.

# चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र परिसरातील पायाभूत सुविधांचे नूतनीकरण करण्याबरोबरच डीपीआर तयार करण्यात येणार : मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या भटाडी खाणीतून कोळसा वाहतूक करणाऱ्या 'पाईप कन्व्हेअर बेल्ट'सह परिसरातील जुन्या पायाभूत सुविधांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आज दिली.




सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भटाडी खाणीतून कोळसा वाहतूक करणाऱ्या पाईप कन्व्हेअर बेल्ट परिसरात ५ मे २०२६ रोजी आग लागण्याची घटना घडली होती. ही आग कन्व्हेअर बेल्टच्या लोडिंग अथवा अनलोडिंग भागात लागलेली नव्हती. कन्व्हेअर बेल्ट ज्या भागातून जातो, त्या परिसरात अनेक शेतकऱ्यांची शेती आहे. शेतातील अवशेष जाळल्यामुळे लागलेल्या आगीचा परिणाम कन्व्हेअर बेल्ट परिसरावर झाला आणि त्यातून ही घटना घडली. या घटनेत कोणतेही नुकसान झाले नसून आग तातडीने नियंत्रणात आणण्यात यश आले होते. आपत्कालीन प्रतिसाद पथकही अपेक्षित वेळेत घटनास्थळी पोहोचल्यामुळे परिस्थितीवर वेळीच नियंत्रण मिळविणे शक्य झाले.

सदर प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्या परिसरातील नागरिकांमध्ये गवत व पीक अवशेष उघड्यावर न जाळण्याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आवश्यकतेनुसार जनजागृती करण्यात येईल. त्याचबरोबर जुन्या झालेल्या पायाभूत सुविधा व यंत्रणांचे नूतनीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी डीपीआर तयार करून टप्प्याटप्प्याने नूतनीकरणाची कामे हाती घेण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# २२ जुलै ते २२ ऑगस्टदरम्यान राज्यभर 'कृषी महोत्सव'चे आयोजन : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई । प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील शेतकऱ्यांसाठी २२ जुलै ते २२ ऑगस्ट या कालावधीत कृषी विभागामार्फत राज्यभर 'कृषी महोत्सव' आयोजित करण्यात येणार असून, या महोत्सवाचे सविस्तर आणि प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कृषी विभागाला दिले.



मंत्रालयातील दालनात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कृषी महोत्सवाच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. यावेळी कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, दूरदृश्य प्रणालीद्वारे कृषी आयुक्त सूरज मांढरे, स्मार्टचे संचालक एम. जे. प्रदीप चंद्रन,नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजना प्रकल्प संचालक मीनल करनवार, कृषी संचालक रफीक नाईकवडी, अविनाश बोरकर, विनयकुमार अवटी, सर्व विद्यापीठांचे कुलगुरू तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कृषीमंत्री भरणे म्हणाले की, यंदाचे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून साजरे करण्यात येत असून, महिला शेतकरी विधेयकही विधिमंडळात सादर करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी महोत्सवात महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य देत त्यांच्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि विविध कृषीविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

ते पुढे म्हणाले की, पेरणीचा हंगाम पूर्ण झाल्यानंतर आयोजित होणाऱ्या या महोत्सवात आधुनिक कृषी तंत्रज्ञान, अत्याधुनिक कृषी अवजारे, यांत्रिकीकरण, पीक व्यवस्थापन, मूल्यवर्धन आणि कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे प्रदर्शन भरविण्यात यावे.

या माध्यमातून शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळून आधुनिक शेतीचा स्वीकार करण्यास चालना मिळेल.राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करून कृषी महोत्सव प्रभावीपणे राबविण्यात यावा, अशा सूचनाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# जळगाव जामोद प्रकरणाने विधानसभेत खळबळ!

**चुकीचा तपास करणाऱ्या पोलिसांना मुख्यमंत्र्यांचा दणका**

**निलंबनासह निष्कासनाची कारवाई, तीन महिन्यांत विभागीय चौकशी**

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथील बेपत्ता महिलेच्या प्रकरणात झालेल्या गंभीर पोलिसी हलगर्जीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत कठोर भूमिका घेतली. चुकीचा तपास करून निष्पाप आई-वडिलांवर खुनाचा गुन्हा दाखल करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनासह सेवेतून निष्कासनाची कारवाई केली जाईल, तसेच संपूर्ण प्रकरणाची विभागीय चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली.







विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संबंधित महिला बेपत्ता असल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर सापडलेल्या एका मृतदेहाची कोणतीही वैज्ञानिक पडताळणी न करता तो याच महिलेचा असल्याचा निष्कर्ष पोलिसांनी घाईघाईने काढला. तपास पूर्ण झाल्याचे दाखवून महिलेच्या आई-वडिलांनाच खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली.

मात्र, काही दिवसांनी संबंधित महिला जिवंत अवस्थेत स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाल्याने संपूर्ण तपासातील गंभीर त्रुटी उघडकीस आल्या. त्यानंतर तिच्या आई-वडिलांची तातडीने सुटका करण्यात आली. दरम्यान, सापडलेल्या मृतदेहाचा स्वतंत्र तपास सुरू असून तो लवकरच पूर्ण केला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणातील गंभीर निष्काळजीपणामुळे संबंधित गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि संबंधित सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. केवळ निलंबनावर न थांबता दोषी अधिकाऱ्यांवर विहित प्रक्रिया पूर्ण करून सेवेतून निष्कासनाचीही कारवाई केली जाईल, असा इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य शासनाने विकसित केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता () तंत्रज्ञानाच्या मदतीने राज्यातील सुमारे १,६०० ते १,७०० बेपत्ता व्यक्तींच्या प्रकरणांचे विश्लेषण करण्यात आले असून त्यातून सात अज्ञात मृतदेहांची ओळख पटविण्यात यश आले आहे. जळगाव जामोद प्रकरणाचाही तपास याच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुरू आहे.

या चुकीच्या तपासामुळे अन्याय सहन करावा लागलेल्या पीडित कुटुंबाला राज्य सरकारतर्फे आर्थिक मदत देण्यात येणार असून संपूर्ण प्रकरणाची विभागीय चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात दिली.

# भूस्खलनच्या घटना चिंता वाढवणाऱ्या

मुंबईत दरवर्षी पावसाळा सुरू होताच पाणी तुंबणे, वाहतूक विस्कळीत होणे, दुर्घटना आणि जीवितहानी अशीच परिस्थिती निर्माण होते. यंदाही मुसळधार पावसानंतर नागरी नियोजन, पायाभूत सुविधा, प्रशासनाची तयारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. येरे घना येरे घना... अशी पावसाची आळवणी महाराष्ट्रात सुरू होते आणि तो पाऊस आल्यानंतर 'नको नको रे पावसा, धिंगाणा अवेळी' अशी परिस्थिती केवळ दोन दिवसांत येते, ती येथील बेफिकीर व्यवस्थेमुळे. यावर्षी पाऊस लांबला. तो आला तेव्हा लगेचच असा धुवाँधार आला की, त्यात जनजीवन तर विस्कळीत झालेच आहे. म्हणजे कित्येक वर्षे बेलगामपणे वागणाऱ्या यंत्रणा या पावसात उघड्या पडल्या आहेत. मुंबईसारख्या जागतिक कीर्तीच्या महानगरात नेमेची येणाऱ्या पावसात पहिल्या दोन दिवसांत दहा मानवी मृत्यू होतात हे वास्तव भयानक शोकात्मक आहे. नियोजनाबद्दल काही महत्त्वाची पावले उचलली जातात काय, या प्रश्नाचे उत्तर आता महाराष्ट्राला हवे आहे. सर्वप्रथम प्रश्न मुंबईचा. शंभर मिलिमीटरच्या वर पाऊस झाला की, मुंबई ठप्प पडते हे आत्तापर्यंतचे सर्व विदित सत्य. कोणाचेही सरकार आले तरी मुंबईची बेटावर आधारित रचना बदलली जाऊ शकत नाही. भौगोलिक परिस्थितीचे हे आव्हान मोठे. त्याबरोबरच दुसरे आव्हान यंत्रणेचे. संकटमोचनासाठी यंत्रणा किती तयार आहेत याचा विचार होतो का? यंत्रणा काही करत नाही असा नागरिकांचा समज होतो. अस्मानी आपत्तीत सुलतानी आपत्ती भर घालते. मुंबईसारखी अवाढव्य महानगरी वाहती राहते याचे कारण येथील व्यवस्था आहे. भारताला 'फंक्शनिंग अनारकी' असे म्हटले जाते. मुंबईबाबत ते संपूर्णतः सत्य आहे. या महानगराचे सर्व व्यवहार यंत्रणा काहीतरी काम करत असतात म्हणूनच सुरू असतात. अर्थात आपण महानगर चालवतो याची जाणीव असल्यामुळे अधिकारी मंडळीतील काही मूठभर लोक कायदे हातात घेतात, ते वाकवतात, त्यासाठी काही 'भेटी' स्वीकारतात आणि शहराची संपूर्ण व्यवस्था बदनाम करतात. खरे तर ज्या शहरात रोजीरोटीसाठी हजारोंचे लोंढे येतात, जागा मिळेल तिथे राहतात, तेथे मुळातच आयुष्याची किंमत कितीशी असणार? दहा बाय बाराच्या खोलीत राहून आपल्या कामाकडे जाणे, पैसे कमावणे आणि ते गावी पाठवून कधीतरी तेथे आपल्या माणसांत परत जाण्याची वाट पाहात राहणे हे मुंबई शहराच्या नागरिकांचे प्राक्तन आहे. इथे येणारे बहुतेक लोक उपरे आहेत. काही परप्रांतातले तर काही महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातले. ते या महानगराच्या श्रीमंतीमागचे खरे हात. मात्र हे सगळे बाहेरून आलेले असल्यामुळे त्यांच्या भल्याचा विचार कुणीही करत नाही. मिळेल तिथे जागा शोधून झोपडपट्टीदादांनी बांधलेल्या झोपडीत ते राहतात. धोकादायक दरडीवरदेखील लोक राहतात. अशा मंडळींना काही नैसर्गिक आपत्ती आली की, पावसाच्या रौद्र रूपासमोर मान टेकवावी लागते. आयुष्य संपते. पावसाळ्यात हे कायमच घडत राहते. मानखुर्द परिसरात झोपडी पडून झालेला एका कुटुंबाचा मृत्यू हा असाच दुर्दैवी प्रकार आहे. वारंवार नोटीस पाठवूनही नागरिक ती घरे रिकामी करत नाहीत, असे प्रशासन म्हणते. पण मुळात त्यांनी जायचे कुठे, पर्यायी व्यवस्था काय आणि शहर सोडून बाहेर गेलो तर पोटाला अन्न कसे मिळणार, असे अनेक प्रश्न या साखळीचा भाग असतात. मुंबई ही सुंदरी. मायावी नगरी. तिचे अत्यंत वाईट रूप पावसात पाहावे लागते. ठिकठिकाणी पाणी साचते. घाण पाणी शहराच्या रस्त्यांवर सुखेनैव विहार करते. साचलेला चिखल आणि शहरात आलेला गाळ ही पुढे समस्या होते. त्यातून रोगराई पसरते. नालेसफाईचे दावे खोटे पडतात. मुळात जनतेला आपण किती कचरा करावा याचे भान नाही. त्या कचऱ्याची विल्हेवाट हा संपूर्ण भारतातला महत्त्वाचा मुद्दा. पावसाळ्यात मुंबईत हा सगळा प्रकार अत्यंत विद्रूप चेहरा घेऊन समोर येतो आणि मग 'मुंबईची तुंबई झाली'सारखे आरोप-प्रत्यारोप समोर येतात. हे आरोप-प्रत्यारोप आणि त्यातून बाहेर पडणे हा प्रशासन आणि सरकारसमोरचा खूप मोठा आव्हानात्मक भाग आहे. कित्येक वर्षांनंतर शिवसेना उबाठाचे सरकार पायउतार झाले आहे आणि त्या जागी भाजपची सत्ता आली आहे. जनतेने सत्तापरिवर्तनासाठी मत दिले ते आयुष्यात काही बदल व्हावा या हेतूने. तसे जर होत नसेल तर कोणतेही सत्तापरिवर्तन 'राव गेले आणि पंत चढले'एवढेच मर्यादित राहील. इथे महिला महापौर असल्यामुळे 'माई गेल्या आणि ताई आल्या', असे मर्यादित होईल. मुंबईत अपघाती मृत्यू नकोत, पावसाळी बदनामी नको असे अभियान राबवायचे असेल तर त्यात सत्ता पक्षाने विरोधकांनाही सामावून घेतले तर बरे पडेल. अनास्था आणि अनागोंदीचा जो भाग आहे तो दूर करायचा असेल तर एक सर्वपक्षीय प्रतिबद्धता लागते. ती अजूनही मुंबईत कुठेही दिसलेली नाही. ती या महानगराची गरज आहे. पावसाचे पाणी वाहून गेल्यानंतर ही मुंबई बदलण्याची ईर्ष्या पुन्हा कुठेतरी दडी मारून बसायला नको. या वेळेच्या पावसात महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला तो मुंबई आणि पुणे यांना जोडणाऱ्या कनेक्टिंग लिंकचा. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अत्यंत मेहनतीने हा मार्ग उभारला. तिथे कोणत्याही दुर्घटना घडू नयेत यासाठी सरकारने उद्घाटनांची तारीख वेळोवेळी लांबवली. आता हा रस्ता जनतेच्या सेवेत आल्यामुळे मुंबई-पुणे दोन्ही मार्गांवरचा सुमारे अर्धा ते पाऊण तासाचा वेळ वाचला. मात्र आज तेथील स्लॅब कोसळला अशा अफवा घटना म्हणून चर्चेत आल्या. भारतातल्या भ्रष्टाचाराची व्याप्ती लक्षात घेता येथे काहीही घडू शकते, असे जनतेला वाटते. कोणत्याही महत्त्वाच्या बांधकामाकडेही आता त्याच नजरेतून बघितले जाते. पारदर्शकता निर्माण होण्यासाठी संशयाने एखाद्या गोष्टीकडे बघितले जाण्यास काहीही हरकत नाही. जिथे राम मंदिरातील दानातच चोरी होते, तेथे प्रत्येक गोष्टीकडे संशयाच्या बघावेसे वाटणे हे अपरिहार्य. सोमवारी आठवड्याला प्रारंभ होताना सकाळी सकाळी कनेक्टिंग लिंकचा स्लॅब कोसळला, असा अपप्रचार मोठ्या प्रमाणात सुरू झाला. प्रत्यक्षात कनेक्टिंग लिंकच्या प्रवेशद्वाराजवळ जो मातीचा दरवाजा उभारला गेला होता तो कोसळला. असा दरवाजा कोसळायला नको हे खरे. पण मुळातच मार्ग लक्षात घ्यावा यासाठी बांधलेले ते मातीचे बांधकाम होते. दरड कोसळल्यामुळे दगडांच्या भाराने ते वाहून गेले. समाजमाध्यमांवर मिसिंग लिंकचे छत कोसळले असा अपप्रचार झाल्यामुळे जे काय वादळ निर्माण झाले ते अत्यंत दुर्दैवी होते. दरडप्रवण भागात कनेकटिंग लिंक बांधली गेली, त्याचे सोहळे झाले. या लिंकबाबत काहीही वावगे घडणार नाही याकडे लक्ष दयायला हवे. झाडें पडून, खड्ड्यात बुडून निष्पापांचे प्राण जातात तेंव्हा सरकारची जबाबदारी अधिकच वाढते हे लक्षात घेतलेले बरे.

# राज्यातील १३८ जलदगती न्यायालयांसाठी न्यायाधीशांच्या उपलब्धतेसाठी उच्च न्यायालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात मंजूर करण्यात आलेल्या १३८ जलद गती न्यायालयांपैकी सध्या केवळ ५८ न्यायालये कार्यरत असून उर्वरित न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून उच्च न्यायालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य डॉ. राहुल कुल यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात एकूण १३८ जलद गती न्यायालये सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, न्यायाधीशांची नियुक्ती ही पूर्णपणे न्यायव्यवस्थेच्या अखत्यारीतील बाब असल्याने सध्या केवळ ५८ न्यायालये कार्यरत होऊ शकली आहेत. गेल्या वर्षभरापासून मुख्यमंत्री म्हणून माझ्या आणि मुख्य न्यायाधीश यांच्या संयुक्त बैठकीत तसेच पत्रव्यवहाराद्वारे मंजूर न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देण्याची विनंती सातत्याने करण्यात येत आहे.

उच्च न्यायालयाने नवीन न्यायाधीशांची भरती आणि पदोन्नती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मंजूर जलद गती न्यायालयांना न्यायाधीश उपलब्ध करून दिले जातील. तोपर्यंत काही न्यायालयांना संबंधित प्रकरणांसाठी 'डिझिग्नेटेड' दर्जा देण्यात आला आहे. मात्र, त्यांना इतर खटल्यांचीही सुनावणी करावी लागते, असेही त्यांनी सांगितले.

पुण्यासह राज्यातील न्यायालयीन पायाभूत सुविधांबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या दहा-बारा वर्षांत महाराष्ट्रात सत्र न्यायालये आणि अतिरिक्त जिल्हा न्यायालयांचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्यात आला आहे. न्यायालयीन पायाभूत सुविधा उभारण्यासाठी शासन आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून देत आहे. खटल्यांच्या संख्येच्या आधारे अतिरिक्त न्यायालयांची आवश्यकता उच्च न्यायालयाच्या समितीकडून निश्चित केली जाते. पुणे व इतर ठिकाणी अतिरिक्त न्यायालयांची मागणी प्राप्त झाल्यास ती खटल्यांच्या संख्येनुसार पडताळून आवश्यकतेनुसार नवीन न्यायालये मंजूर करण्यात येतील.

यासंदर्भात अधिकचे निर्देश देत विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांनी कनिष्ठ न्यायव्यवस्थेतील मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे न्यायदान प्रक्रियेला विलंब होत असल्याकडे लक्ष वेधले. विशेषतः पुण्यातील मकोका न्यायालयासह विविध न्यायालयांमध्ये अनेक फौजदारी खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्याने सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायाधीशांची रिक्त पदे तातडीने भरावीत आणि मुख्य न्यायाधीशांशी समन्वय साधून ही प्रक्रिया गतीमान करावी, असेही निर्देश अध्यक्षांनी दिले.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, पुढील मुख्य न्यायाधीशांच्या बैठकीच्या अजेंड्यावर हा विषय प्राधान्याने समाविष्ट करण्यात येईल. राज्यातील ज्या ठिकाणी न्यायाधीशांची कमतरता आहे किंवा नव्या नियुक्त्यांची आवश्यकता आहे, त्या सर्व बाबी उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देऊन भरती प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# कामगार कायद्यांच्या राज्य नियमावलीवर कामगार संघटनांशी सविस्तर चर्चा करून अहवाल केंद्रास पाठवावा – कामगार मंत्री अ‍ॅड. फुंडकर

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई । प्रतिनिधी :** भारत सरकारच्या चार नवीन श्रम संहितांच्या अनुषंगाने राज्य शासनाने तयार केलेल्या 'महाराष्ट्र वेतन संहिता नियम', 'महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम', 'महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती नियम' आणि 'महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम' या चारही नियमावलींवर कामगार आणि कर्मचारी संघटनांशी कामगार विभागाच्या चार स्वतंत्र तज्ज्ञ समित्यांनी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीसोबत चर्चा घडवून आणावी. कामगार संघटनांचे मत आणि सूचना पूर्णपणे जाणून घेतल्यानंतरच याचा एकत्रित संयुक्त अहवाल केंद्रीय श्रम मंत्रालयाला पाठवावा, असे निर्देश कामगार मंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर यांनी दिले.

कामगार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कामगार विभागाच्या अप्पर मुख्य सचिव आय. ए. कुंदन, उपसचिव दीपक पोकळे, स्वप्नील कापडणीस, रोशनी कदम यांच्यासह 'कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समिती'चे अध्यक्ष डॉ. कैलास कदम आणि सरचिटणीस गोविंदराव मोहिते प्रामुख्याने उपस्थित होते. याशिवाय कामगार चळवळीतील प्रमुख संघटनांचे प्रतिनिधी म्हणून इंटक, आयटक, एचएमएस, सीटू, एआयसीसीटीयु, एनटीयुआय आणि बीकेएस या संघटनांचे पदाधिकारीही या बैठकीस उपस्थित होते.

बैठकीदरम्यान कामगार मंत्री अ‍ॅड. फुंडकर म्हणाले, नवीन श्रम संहितांच्या अंमलबजावणीपूर्वी राज्यातील कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे ही शासनाची प्राथमिकता आहे. यासाठीच शासनाने मसुदा नियमावली जाहीर करून त्यावर हरकती व सूचना मागविल्या आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता राहावी म्हणून कामगार विभागाच्या वतीने चार स्वतंत्र तज्ज्ञ समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. या तज्ज्ञ समित्यांनी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीसोबत समन्वय साधून सविस्तर चर्चा करावी.

केवळ नाममात्र न ठरता प्रत्येक मुद्द्यावर सखोल चर्चा व्हावी, यासाठी कामगार विभागाने तातडीने बैठकांचे अधिकृत वेळापत्रक जारी करावे, अशा सूचना मंत्र्यांनी विभागला दिल्या. या संवादाच्या माध्यमातून कामगार संघटनांनी मांडलेल्या सर्व रास्त मागण्या, सूचना आणि आक्षेप नोंदवून घेतले जातील. कामगारांचे हक्क आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेला कुठेही बाधा पोहोचणार नाही, याची काळजी राज्य शासन घेईल, असेही कामगार मंत्री म्हणाले.

तज्ज्ञ समिती आणि कामगार संघटना यांच्यातील या विस्तृत चर्चेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, त्यातून समोर आलेल्या निष्कर्षांचा आणि सूचनांचा अंतर्भाव करून एक सर्वसमावेशक एकत्रित संयुक्त अहवाल तयार केला जाईल. हा अंतिम अहवाल पुढील मंजुरी आणि कार्यवाहीसाठी केंद्रीय श्रम मंत्रालयाकडे सुपूर्द करण्यात येईल, असे कामगार मंत्र्यांनी स्पष्ट केले.


## क्वीन २ वर कोर्टाची टांगती तलवार; कंगना रणौतच्या चित्रपटा विरोधात २५० कोटींचा दावा

**मुंबई । प्रतिनिधी :** अभिनेत्री तथा भाजपा खासदार कंगना रणौत हिने काही दिवसांपूर्वीच आपण 'क्वीन २' चं शूट पूर्ण केल्याचं सोशल मीडियावर जाहीर केलं होतं. त्यानंतर सुरू झालेला वाद आता मुंबई उच्च न्यायालयात पोहचला आहे. २०१४ मधील सुपरहिट सिनेमा क्वीनचे निर्माते 'फँटम स्टुडिओज'नं क्वीन २ चे निर्माते 'जिओस्टार इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'ला याप्रकरणी मंगळवारी (७ जुलै) कोर्टात खेचलं आहे.

आता लवकरच या याचिकेवर सुनावणी होणं अपेक्षित आहे. सिनेमाचा दुसरा भाग बनवताना आपल्याला विश्र्वासात न घेताच तो तयार करण्यात आल्याचा दावा फँटमनं आपल्या याचिकेतून केला आहे. त्यामुळे या सिनेमाच्या प्रदर्शनावर स्थगिती मागत २५० कोटींच्या नुकसानभरपाईची मागणीही या याचिकेतून करण्यात आली आहे. फँटमच्या दाव्यानुसार २०१४ मध्ये जेव्हा क्वीनची निर्मिती करण्यात आली होती, तेव्हाच त्यांच्यात आणि जिओस्टारमध्ये करार झाला होता की, भविष्यात या सिनेमाचा सिक्वेल किंवा प्रिक्वेल बनवायचा झाल्यास तो या दोन्ही कंपन्या ५० टक्के भागीदारीत मिळून बनवतील. त्यानुसार या सिनेमासाठी फँटमनं कोणतीही परवानगी दिलेली नाही.

# एसआयआर : मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न

मतदानाचा दिवस उजाडतो. उत्साहाने एक नागरिक मतदान केंद्रावर पोहोचतो. रांगेत उभा राहतो. त्याची वेळ येते. मात्र मतदार यादी तपासल्यानंतर त्याला सांगितले जाते आपले नाव यादीत नाही. काही क्षणांसाठी तो स्तब्ध होतो. मतदानाचा अधिकार असतानाही तो त्या दिवशी तो वापरू शकत नाही. त्या क्षणी त्याला जाणवते की लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार केवळ मतदानाच्या दिवशी मिळत नाही; तो त्याही आधी मतदार यादीत आपल्या नावाच्या अचूक नोंदीपासून सुरू होतो.




ही जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, यासाठी भारत निवडणूक आयोगा मार्फत वेळोवेळी यादी अद्यावत करण्यात येते. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर). ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय उपक्रम नाही; ती प्रत्येक पात्र नागरिकाच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न आहे.

**मतदार यादी म्हणजे लोकशाहीचा पाया**

घराचा मजबूत पाया दिसत नाही, पण संपूर्ण घर त्यावर उभे असते. मतदार यादीचेही तसेच आहे. मतदान केंद्रावरील मतपेटी, निवडणुकीची प्रक्रिया किंवा निकाल यापूर्वी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असतेमतदार यादीची अचूकता.

मतदार यादी ही केवळ नावांची यादी नसते. ती देशातील प्रत्येक पात्र नागरिकाच्या समान अधिकाराची अधिकृत नोंद असते. या यादीत नाव अचूक असणे म्हणजे मतदानाचा अधिकार सुरक्षित असणे. नाव, पत्ता किंवा इतर माहिती योग्य असल्यामुळे भविष्यातील मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नोंद ही लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरते.

**एसआयआर का आवश्यक आहे?**

दरवर्षी नियमित पुनरीक्षणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये नवीन मतदारांची नोंद, माहितीतील बदल किंवा दुरुस्ती केली जाते. मात्र काही वेळा अधिक व्यापक आणि सखोल पडताळणीची आवश्यकता निर्माण होते. अशा वेळी एसआयआर राबविण्यात येते.

या विशेष पुनरीक्षणाचा उद्देश प्रत्येक पात्र मतदाराची नोंद शक्य तितकी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह ठेवणे हा असतो. कालांतराने स्थलांतर, पत्त्यातील बदल, नव्याने पात्र झालेले मतदार किंवा इतर कारणांमुळे माहितीमध्ये बदल होऊ शकतात. एसआयआर या सर्व बाबींकडे अधिक बारकाईने पाहते. त्यामुळे मतदार यादी अधिक सक्षम, पारदर्शक आणि वास्तवाशी सुसंगत बनते.

ही प्रक्रिया भविष्यातील निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अधिक सहज आणि निर्विघ्न व्हावा, यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**घरभेट देणारा अधिकारी विश्वास जपणारा दुवा**

या प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) किंवा निवडणूक कर्मचारी नागरिकांच्या भेटी घेतात. अनेकदा ही भेट केवळ कागदपत्रांची पडताळणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती त्यापेक्षा कितीतरी मोठी असते.

घराच्या दाराशी आलेला बीएलओ हा केवळ माहिती नोंदवणारा अधिकारी नसतो; तो प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहावा, यासाठी काम करणारा महत्त्वाचा दुवा असतो. त्याच्या नोंदींमुळे मतदार यादी अधिक अचूक बनते आणि भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक तयारी पूर्ण होते.

ही प्रक्रिया नागरिक आणि निवडणूक व्यवस्थापन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करते. कारण लोकशाही मजबूत होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांचा परस्पर संवाद तितकाच आवश्यक असतो.

**ही प्रक्रिया प्रशासनासाठी नव्हे प्रत्येक मतदारासाठी आहे**

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत समान मूल्य घेऊन येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आवाज त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे मतदार यादीतील स्वतःची माहिती अचूक राहणे म्हणजे आपल्या त्या आवाजाची खात्री करून घेणे होय.

एसआयआर ही कोणत्याही एका विभागासाठी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी राबवली जाणारी प्रक्रिया नाही. तिचा सर्वाधिक लाभ नागरिकालाच मिळतो. कारण योग्य आणि अद्ययावत मतदार यादी म्हणजे भविष्यात मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने मतदान करता येण्याची खात्री.

या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे केवळ एक औपचारिकता पूर्ण करणे नव्हे; तर स्वतःच्या घटनात्मक अधिकाराचे जतन करण्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे होय. लोकशाहीतील आपली उपस्थिती नोंदविण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.

**उद्याच्या मतदानाचा विश्वास आजच्या सहभागातून**

लोकशाही ही केवळ निवडणुकीच्या दिवशी जिवंत होत नाही. ती प्रत्येक वेळी बळकट होते, जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया मनापासून पूर्ण केली जाते.

एसआयआर ही अशीच एक विश्वास निर्माण करणारी प्रक्रिया आहे. आज काही मिनिटे देऊन केलेली माहितीची पडताळणी उद्या मतदानाच्या दिवशी निश्चिंतपणे मतदान करण्याचा आत्मविश्वास देते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ नोंदी अद्ययावत करण्यापुरती मर्यादित राहत नाही; ती नागरिक आणि लोकशाही यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा पूल बनते.

प्रत्येक मत महत्त्वाचे असते, कारण त्यामागे एका नागरिकाची ओळख, त्याचा अधिकार आणि देशाच्या लोकशाहीवरील विश्वास दडलेला असतो. म्हणूनच एसआयआर ही ''कोणासाठी तरी'' नसून आपल्या प्रत्येकासाठी आहे. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे आपल्या मतदानाच्या अधिकाराला अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी निश्चित करण्याचा सकारात्मक निर्णय. आणि म्हणूनच, ही प्रक्रिया माझ्यासाठी आहे आणि त्यात सहभागी होणे हे माझ्या लोकशाही प्रवासाचे स्वाभाविक पाऊल आहे.

महाराष्ट्रात भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत एसआयआर अंतर्गत घरभेटींद्वारे गणना प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या काळात बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घराला भेट देऊन गणना फॉर्म उपलब्ध करून देतात, आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करतात आणि मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी माहिती संकलित करतात. त्यानंतर प्राप्त माहितीची छाननी, दावे व हरकतींची प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अचूक, सुरक्षित आणि निर्विघ्न राहावा, हा आहे.

**– सचिन अडसूळ,**
जिल्हा माहिती अधिकारी,
कोल्हापूर

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान मंदिरात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी घेतले दर्शन

## उपमुख्यमंत्र्यांनी केली देहू येथे संत तुकाराम महाराज पादुकांची विधीवत पूजा

दैनिक आपला विदर्भ

**पुणे । प्रतिनिधी :** जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान येथील शिळा मंदिरामध्ये तुकाराम महाराजांच्या पादुकांची राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विधीवत पूजा करुन दर्शन घेतले.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, सुनील शेळके, माजी खासदार युवराज छत्रपती संभाजीराजे, माजी आमदार विलास लांडे, श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे, पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. गणेश महाराज मोरे, ह.भ.प वैभव महाराज मोरे, ह.भ.प दिलीप महाराज मोरे, विश्र्वस्त ह.भ.प. विक्रमसिंह मोरे, ह.भ.प.उमेश महाराज मोरे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मोरे आदी उपस्थित होते. दर्शनानंतर







संस्थानच्यावतीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीमती पवार म्हणाल्या, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होत आहे. दरवर्षीच भक्तीमय वातावरण माझ्या मनाला भावते. माऊलींना भक्तांची काळजी असल्यामुळे संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा सुरळीतपणे पार पडेल, भक्तांना चांगल्या प्रकारे दर्शन व्हावे, त्यांची गैरसोय होवू नये, म्हणून आज निसर्गाने पावसाला विश्रांती दिली असावी, असेही श्रीमती पवार यावेळी म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, काल संपूर्ण जिल्ह्यातील पर्जन्यमानाचा आढावा घेऊन वारकऱ्यांना पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी श्री क्षेत्र देहू आणि श्री क्षेत्र आळंदी येथे न येता पुणे शहरातच थांबावे आणि पालखी शहरात दाखल झाल्यानंतर सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. या भाविक भक्तांची पुण्यातच व्यवस्था करण्याचे निर्देशही देण्यात आलेले आहेत.

टाळ-मृदुंगाच्या तालावर भक्तिरसात चिंब झालेले वारकरी, 'ज्ञानोबा माऊली', 'माऊली, माऊली' चा गजर, डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या-पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखीचे आज पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे.

# महत्त्वाचे...

## रत्नागिरीच्या खेडमध्ये मुसळधार पावसानं हाहाकार; भीषण भूस्खलन, एक सुखरूप, दोघं अद्याप बेपत्ता

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी :** जून महिल्यात दडी मारलेल्या पावसानं मागील काही दिवसांपासून दमदार हजेरी लावली आहे. यामुळं राज्यात अनेक ठिकाणी नदी-नाले ओसंडून वाहत आहेत. तर काही ठिकाण भूस्खलन आणि दरडी कोसळण्याच्या घटना घडत आहेत. सोमवारी (दि. ६) रात्री रात्री सव्वानऊच्या सुमारास खेड तालुक्यातील दहिवली येथील शेलारवाडीमध्ये भूस्खलन झालं. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळं डोंगराचा भाग अचानक एका घरावर कोसळला. एका वृद्ध महिलेची सुटका केली असून अन्य दोघांचा शोध अद्याप सुरू आहे. सोमवारी रात्री अचानक डोंगरावरून माती आणि दगडांचा मोठा ढिगारा शेलार कुटुंबाच्या घरावर आला. त्यामुळं घराचा काही भाग जमीनदोस्त झाला. यात घरातील तीन सदस्य ढिगाऱ्याखाली अडकले. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केलं. स्थानिकांच्या मदतीमुळं ७५ वर्षीय कल्पना शेलार यांना ढिगाऱ्याखालून सुखरूप बाहेर काढण्यात यश आलं. यानंतर त्यांना उपचारासाठी कळबणी ग्राम ीण रुग्णालयात दाखल केलं आहे. ८५ वर्षीय शांताराम बाळा शेलार आणि ३५ वर्षीय सतीश शेलार यांचा शोध घेण्याचं काम युद्ध पातळीवर सुरू आहे.

## आरटीओतील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी; दोषींवर कठोर कारवाई केली जाईल : मुख्यमंत्री

**मुंबई। प्रतिनिधी :**राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) विभागातील कथित गैरव्यवहार, कर चुकवेगिरी आणि अनियमिततांच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यासंदर्भात परिवहन मंत्र्यांशी चर्चा केली असून, सभागृहातील सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयावरील चर्चेला उत्तर देताना यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, महागड्या लक्झरी वाहनांच्या नोंदणीसंदर्भात काही प्रकरणांमध्ये कर चुकवेगिरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. काही वाहनमालक महाराष्ट्रात वास्तव्यास असून राज्यातील बँकांकडून कर्ज घेत असतानाही वाहनांची नोंदणी मात्र दादरा-नगर हवेली, दमण-दीव, पुदुच्चेरी आदी ठिकाणी केल्याची उदाहरणे समोर आली आहेत. अशा प्रकारांवर आरटीओकडून कारवाई सुरू आहे. भविष्यात कर चुकवेगिरी रोखण्यासाठी जीएसटी पडताळणी तसेच कर्ज व रहिवासाशी संबंधित कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्यात येईल. आरटीओ विभागासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी, ध्वनिचित्रफिती आणि अन्य आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आयपीएस अधिकारी प्रियंका नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. या त्रिसदस्यीय समितीत अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड आणि दक्षता अधिकारी मंदार जावळे यांचा समावेश आहे. या समितीला एका महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## नाशिकमधील ढगफुटीचा धोका टळला; संततधार पावसामुळे वाढली गोदावरी नदीच्या पाण्याची पातळी

**नाशिक :** नाशिक शहरावरील ढगफुटीचं संकट टळलं आहे. त्र्यंबकेश्वर-नाशिक मार्गे जाण्याची शक्यता असलेला भोवरा आता उत्तर दिशेला सुरतकडे आणि दक्षिण दिशेला अकोले (अहिल्यानगर) परिसराकडे सरकला आहे. त्याम ुळे तूर्तास नाशिककरांना दिलासा मिळाला आहे. सोमवारी रात्रीपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे गोदावरी नदीच्या पाण्याची पातळी वाढली आहे.

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार नाशिक त्र्यंबकेश्वर परिसरात ७ जुलै रोजी ढगफ ुटीची शक्यता वर्तवण्यात आली होती. यानुसार प्रशासनानं सतर्क राहून तातडीनं उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानुसार नाशिक जिल्हा प्रशासनाच्या वतीनं सतर्क म्हणून नाशिक जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली होती. तसेच अतिमहत्त्वाच्या कामाव्यतिरिक्त घराबाहेर पडू नये, असे निर्देशदेखील देण्यात आले होते. त्र्यंबकेश्वर-नाशिक मार्गे जाण्याची शक्यता असलेला भोवरा आता उत्तर दिशेला सुरतकडे आणि दक्षिण दिशेला अकोले (अहिल्यानगर) परिसराकडे सरकल्याचे दिसत आहे. घाटमाथ्यावर अद्यापही मुसळधार पाऊस सुरू आहे.

एकूण परिस्थिती सध्या नियंत्रणात असून तुलनेनं समाधानकारक राहिल्याचं जिल्हा प्रशासनाने म्हटलं आहे. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हे सोमवारी रात्रीच मुंबई येथून नाशिकला पोहोचले. मंत्री महाजन यांनी परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन नाशिककडे येत असतानाच अतिवृष्टी होणाऱ्या इगतपूरी आणि त्र्यंबकेश्वर भागाचा दौरा केला. तसेच पाणी साचू शकते, अशा भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी तातडीनं उपाययोजना करण्यासाठी विविध ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली.

# शेतकऱ्यांना आधुनिक बाजारपेठ, प्रक्रिया सुविधा आणि निर्यातीच्या संधी उपलब्ध करुन देणार - पणन मंत्री रावल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना आधुनिक बाजारपेठ, प्रक्रिया सुविधा आणि निर्यातीच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतील असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पाचा आढावा पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. तेव्हा ते बोलत होते.सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत प्रकल्पाची सद्यस्थिती, आतापर्यंतची प्रगती तसेच प्रस्तावित मॅग्नेट २.० प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस आशियाई विकास बँकेचे संचालक ताकेशी उएडा, वरिष्ठ जलसंपदा तज्ज्ञ अलेक्सिया मिशेल्स, कृषी व नैसर्गिक संसाधन विशेषज्ञ क्रिशन सिंग रौतेला, मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी मूल्यसाखळी आणि काढणीनंतरच्या पायाभूत सुविधांना अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने कामाला गती देण्यात यावी. राज्यातील कृषी उत्पादनांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा



वेळेत उभारण्यात याव्यात, असे त्यांनी सांगितले.

राज्यातील कृषी पणन व्यवस्थेला आधुनिक स्वरूप देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, डिजिटल प्रणालींचा वापर, हब-अँड-स्पोक लॉजिस्टिक मॉडेलची उभारणी आणि जेएनपीटी, वाढवण बंदर, समृद्धी महामार्ग यांसारख्या प्रमुख पायाभूत सुविधांशी कृषी मूल्यसाखळी जोडण्याचे नियोजन प्रभावीपणे राबविण्याचेनिर्देश तसेच, प्रकल्पाची प्रशासकीय व वित्तीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करून आशियाई विकास बँकेकडील पुढील मंजुरीसाठी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करावी, असे निर्देशही पणन मंत्री रावल यांनी दिले. मॅग्नेट प्रकल्पांतर्गत आतापर्यंत ३३ हजारांहून अधिक फलोत्पादक शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून ६६ काढणी पश्चात पायाभूत सुविधा उपप्रकल्पांना वित्तसहाय्य करण्यात आले आहे. १५० शेतकरी उत्पादक कंपन्या व मूल्यसाखळीतील गुंतवणूकदार यांना सवलतीच्या व्याजदराने आर्थिक सहाय्य, ७३ शेतकरी उत्पादक कंपन्यांना नाविन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब, तसेच २१ कृषी पणन मंडळांच्या सुविधांचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. प्रकल्पामुळे सुमारे २.३२ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ झाला असून, ४८ टक्के महिलांचा सहभाग असलेल्या सुमारे ४,३०० रोजगारांची निर्मिती तसेच २७१ कोटी रुपयांची खाजगी गुंतवणूक झाली असल्याचीमाहिती यावेळी देण्यात आली. या प्रकल्पाअंतर्गत २३ कृषी मूल्यसाखळ्यांचा विकास, एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांचे क्षमता विकास प्रशिक्षण, ग्रीनफिल्ड कृषी पायाभूत सुविधा, शेतकरी उत्पादक कंपन्यांना अधिक आर्थिक सहाय्य, कृषी प्रक्रिया, साठवणूक, निर्यात आणि बाजार व्यवस्थेचे सक्षमीकरण यावर विशेष भर देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## १ ऑगस्टपासून ॲप-आधारित बाईक-टॅक्सींसाठी नवीन परवाने, सरकार नवीन धोरण आणणार!

**मुंबई। प्रतिनिधी :** राज्यात अनधिकृतपणे सुरू असलेल्या ॲप-आधारित बाईक-टॅक्सी सेवांना कायदेशीर चौकटीत आणण्यासाठी राज्य सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ ऑगस्ट २०२६ पासून ॲप-आधारित बाईक-टॅक्सींसाठी नवीन परवाने जारी करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी (७ जुलै) विधानसभेत केली. यासंदर्भातील प्रश्न आमदार दिलीप लांडे यांनी उपस्थित केला होता.

सध्या राज्यात सुमारे ४ ते ४.५ लाख ॲप-आधारित बाईक टॅक्सी कोणत्याही वैध परवान्याशिवाय सुरू आहेत. या सेवांमधून शासनाला कोणताही महसूल मिळत नसल्यामुळं त्यांना नियमनाच्या कक्षेत आणण्यासाठी नवीन धोरण तयार करण्यात आलं आहे, असं प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. दरम्यान, नवीन धोरणानुसार, बाईक टॅक्सीचा परवाना फक्त महाराष्ट्राचा रहिवासी दाखला असलेल्या युवकांनाच दिला जाणार आहे. यासाठी आवश्यक बॅज, वैध वाहनचालक परवाना आणि शासनाने निश्चित केलेल्या इतर पात्रता अटी पूर्ण करणे बंधनकारक असणार आहे. या निर्णयामुळं राज्यातील स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा सरकारचा दावा आहे.

प्रताप सरनाईक म्हणाले की, सरकारनं यापूर्वी रॅपिडो, ओला आणि उबर यांसारख्या कंपन्यांना केवळ ई-बाईकद्वारे प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी दिली होती. मात्र, संबंधित कंपन्यांनी मोठ्या प्रम ाणावर पेट्रोलवर चालणाऱ्या बाईकही सेवेत आणल्या. त्यामुळं परिवहन विभागानं त्यांच्याविरोधात कारवाई सुरू केली. या कंपन्यांचे ॲप देशभर एकाच प्लॅटफफॉर्मवर कार्यरत असल्यामुळं तांत्रिक अडचणी होत्या, तरीही विभागानं सातत्यानं कारवाई केली आहे.'' दरम्यान, नवीन धोरणानुसार प्रत्येक बाईक टॅक्सी चालकाकडून दररोज ५ रुपये शुल्क आकारले जाणार असून, प्रत्येक प्रवासाच्या भाड्याच्या २ टक्के रक्कम शासनाकडे शुल्क म्हणून जमा करावी लागणार आहे. यामुळं राज्य सरकारच्या महसुलात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

नवीन व्यवस्थेनुसार, महिला आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसंच बाईक टॅक्सी चालकांना शासनानं निर्धारित केलेल्या सर्व सुरक्षा नियमांचे पालन करणं बंधनकारक असेल. नवीन धोरणानुसार बाईक टॅक्सीचा कमाल वेग ताशी २५ किलोमीटर इतका निश्चित करण्यात आला आहे. याआधी महिला सुरक्षेच्या काही तक्रारी सरकारला प्राप्त झाल्या होत्या.

## मालाड येथील शाळेतील प्रार्थना कार्यक्रम प्रकरणी गुन्हा दाखल - गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**मुंबई। प्रतिनिधी :**मुंबईतील मालाड पश्चिम येथील रिजॉयस इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रार्थना कार्यक्रमाबाबत प्राप्त तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे, अशी माहिती गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. सदस्य अतुल भातखळकर यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता, त्यास उत्तर देताना ते बोलत होते. डॉ.भोयर यांनी सांगितले की, १० मे २०२६ रोजी मालाड पश्चिम येथील रिजॉयस इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित प्रार्थना कार्यक्रमात एका व्यक्तीने उपस्थितांच्या डोक्यावर हात ठेवून आजार बरे करण्यासह जीवनातील दुःख दूर करण्याबाबत दावे केल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी चौकशी केली असता, उपस्थितांना धर्मांतर करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा आग्रह करण्यात आल्याचे आढळून आले नाही. तथापि, चौकशीदरम्यान तक्रारदाराला घरामध्ये देवी-देवतांची छायाचित्रे लावू नयेत, असे सांगण्यात आल्याचे निष्पन्न झाले; तसेच संबंधित कार्यक्रमातून अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचा प्रकार निदर्शनास आल्याने मालाड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींसह महाराष्ट्र नरबळी, इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# डी.एल.एड. प्रवेशासाठी विशेष फेरी जाहीर

## १२ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविले


दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** राज्यातील अध्यापक विद्यालयांमधील रिक्त जागा भरण्यासाठी डी.एल.एड. प्रवेश प्रक्रियेची विशेष फेरी जाहीर करण्यात आली असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी दि. १२ जुलै २०२६ च्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहेत. संबंधित जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयनिहाय रिक्त जागांचा तपशील परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून, या फेरीतील प्रवेश 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर दिले जाणार आहेत.

विशेष फेरीत यंदा इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले व नव्याने डी.एल.एड. प्रवेशासाठी अर्ज करू इच्छिणारे विद्यार्थी, नियमित प्रवेश प्रक्रियेत ऑनलाइन अर्ज पूर्ण न भरलेले किंवा अर्जात आवश्यक दुरुस्ती न केलेले विद्यार्थी तसेच यापूर्वी कोणत्याही प्रवेश फेरीत प्रवेश न घेतलेले विद्यार्थी सहभागी होऊ शकणार आहेत.

नियमित प्रवेश प्रक्रियेत अध्यापक विद्यालय न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी उपलब्ध रिक्त जागांनुसार आपल्या पसंतीक्रमात बदल करून संबंधित अध्यापक विद्यालयांचा समावेश करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यापूर्वी डी.एल.एड. प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाइन शुल्क भरले असले, मात्र प्रत्यक्ष प्रवेश घेतला नसलेल्या विद्यार्थ्यांना विशेष फेरीसाठी पुन्हा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. मात्र, पूर्वी नोंदविलेलाच ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक वापरणे बंधनकारक राहणार आहे.

अर्ज मंजूर झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या लॉगिनमधील सातव्या टप्प्यात



जाऊन Click to Find Seat Take Admission या पर्यायाद्वारे विभाग, जिल्हा व अध्यापक विद्यालयाचा प्रकार निवडून रिक्त जागा असलेल्या संस्थेत प्रवेश निश्र्चित करावा. प्रवेश निश्र्चित करण्यापूर्वी संबंधित विद्यालयाची खात्री करूनच Yes Confirm Seat या पर्यायावर क्लिक करावे. एकदा प्रवेश निश्र्चित झाल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही. प्रवेश निश्र्चित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्राची प्रिंट काढून चार दिवसांच्या आत संबंधित अध्यापक विद्यालयात आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक : दि. ८ ते १२ जुलै २०२६ दरम्यान विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज सादर करणे. दि. १३ जुलै २०२६ रोजी पडताळणी अधिकाऱ्यांकडून ऑनलाइन प्रमाणपत्र पडताळणी. दि. १४ जुलै २०२६ (दुपारी २ वाजेपर्यंत) विद्यार्थ्यांकडून अर्जातील दुरुस्ती व सायंकाळी ६ वाजेपर्यंत दुरुस्त अर्जांची अंतिम पडताळणी केली जाईल. दि. १५ जुलै २०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांकडून अध्यापक विद्यालय निश्चित करून प्रवेशपत्र डाउनलोड करणे. दि. २० जुलै २०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधित अध्यापक विद्यालयांकडून विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष ऑनलाइन प्रवेश निश्चित करणे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी निर्धारित कालावधीत www.maa.ac.in या संकेतस्थळावर अर्ज करून प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रशासनाच्या सोयीपेक्षा जनतेची सोय महत्त्वाची

## मोताळा बुलढाणा कार्यक्षेत्रातच ठेवा! ॲड. जयश्री शेळके

दैनिक आपला विदर्भ




**अमरावती । प्रतिनिधी :** प्रस्तावित खामगाव अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातून मोताळा तालुका वगळून तो बुलढाणा कार्यक्षेत्रातच कायम ठेवण्याची मागणी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)च्या प्रवक्त्या ॲड. जयश्री शेळके यांनी मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली. यावेळी त्यांनी मा. मुख्यमंत्री यांच्या नावे सविस्तर निवेदन सादर केले.

बुलढाणा जिल्ह्यात प्रशासकीय विकेंद्रीकरणाच्या उद्देशाने खामगाव येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, त्यामध्ये मोताळा तालुक्याचा समावेश करण्यात येणार असल्याची माहिती प्रसारमाध्यमांतून समोर आली आहे. मात्र, मोताळा तालुक्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव व्यवहार्य नसून नागरिकांच्या हिताच्या विरोधात आहे.

मोताळा तालुक्याचे जिल्हा मुख्यालय बुलढाणा शहराशी भौगोलिक, प्रशासकीय आणि दळणवळणाच्या दृष्टीने अधिक जवळचे नाते आहे. मोताळा ते बुलढाणा हे अंतर अवघे २२ किलोमीटर असून, मोताळा ते खामगाव हे सुमारे ४९ किलोमीटर आहे. त्यामुळे प्रशासकीय कामांसाठी बुलढाणा हेच नागरिकांसाठी अधिक सोयीचे केंद्र आहे. मोताळा तालुक्यातील बहुतांश नागरिकांची प्रशासकीय, शैक्षणिक, वैद्यकीय तसेच अन्य शासकीय कामांसाठी बुलढाणा शहरातच नियमित ये-जा असते.

मोताळा तालुक्याचा खामगाव कार्यक्षेत्रात समावेश झाल्यास नागरिकांना अतिरिक्त अंतराचा प्रवास करावा लागेल, वेळ व आर्थिक खर्च वाढेल तसेच प्रशासकीय कामकाजासाठी अनावश्यक अडचणी निर्माण होतील. त्यामुळे प्रशासन लोकाभिमुख करण्याच्या उद्देशालाच बाधा येण्याची शक्यता आहे.

त्यामुळे मोताळा तालुक्याचा प्रस्तावित खामगाव अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समावेश न करता तो बुलढाणा कार्यक्षेत्रातच कायम ठेवण्यात यावा. स्थानिक नागरिकांच्या भावना, भौगोलिक परिस्थिती आणि जनसुविधेचा विचार करून शासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी या विषयावर सकारात्मक चर्चा झाली असून, मा. विभागीय आयुक्तांनी शासनाकडे यासंदर्भातील सविस्तर अहवाल पाठविण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती ॲड. जयश्री शेळके यांनी दिली.

# महासारथी पोर्टलवर नोंदणी करून महाआयडी तयार करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा । प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ अधिक सुलभ, जलद आणि एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी महासारथी हे एकात्मिक डिजिटल पोर्टल सुरू केले आहे. या पोर्टलवर आधार प्रमाणीकरणाद्वारे नोंदणी केल्यानंतर प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र महाआयडी (चरहरखऊ) क्रमांक प्रदान करण्यात येणार आहे.

भविष्यात राज्य शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ घेण्यासाठी हा एकच महाआयडी क्रमांक वापरता येणार असून, नागरिकांना त्यांच्या पात्रतेनुसार उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजना व सेवांची माहितीही या पोर्टलवर एकाच ठिकाणी पाहता येणार आहे.

महाआयडी तयार करण्यासाठी नागरिकांनी महासारथी पोर्टलला भेट देऊन आधार प्रमाणीकरणाद्वारे नोंदणी करावी. त्यानंतर आवश्यक वैयक्तिक माहिती भरून महाआयडी क्रमांक तयार करावा. लॉगिन करून माहितीची पडताळणी तसेच आवश्यक असल्यास अद्ययावत करावी. त्यानंतर पात्रतेनुसार उपलब्ध शासकीय योजना व सेवांची माहिती पोर्टलवरून मिळू शकते.

महासारथी पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी नागरिकांनी https://mahasarathi.maharashtra.gov.in/home/landing या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच नोंदणी प्रक्रियेबाबत मार्गदर्शनासाठी https://youtu.be/iYolQHaFM-I या व्हिडिओचा उपयोग करावा. जास्तीत जास्त नागरिकांनी महासारथी पोर्टलवर नोंदणी करून महाआयडी तयार करावा आणि शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ घेण्यासाठी त्याचा उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

### भंडारदरा धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ, नदीकाठच्या नागरिकांसह शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचा इशारा

**अहिल्यानगर :** अकोले तालुक्यात गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळं धरणांतील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. भंडारदरा धरणात आज सकाळी ६ वाजेपर्यंत ५०४६ एमसीएफटी ४५.७१ टक्के पाणीसाठा झाला. अवघ्या २४ तासात ११४७ एमसीएफटी पाण्याची आवक झाली आहे.

निळवंडे धरणात १८३९ एमसीएफटी २२.०७ टक्के तर आढळा धरणात ३६६ एमसीएफटी ३४.५३ टक्के पाणीसाठा नोंदवण्यात आला आहे. या तीनही धरणांतून सध्या कोणताही विसर्ग सुरू नसला तरी पावसाचा जोर कायम राहिल्यास पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, वाकी धरण पूर्ण क्षमतेनं भरलं असून त्यातील ११२.६६ एमसीएफटी पाणीसाठा १०० टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळं धरणातून २.१९९ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

### नवी मुंबईत थरारक घटना! सुसाट कारने 10 लोकांना चिरडलं, कारचालक फरार

नवी मुंबई : नवी मुंबईतील तळोजा परिसरातून अपघाताची एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. तळोजा सेक्टर १० मध्ये एका अनियंत्रित कारने रस्त्यावरील ८ ते १० जणांना भीषण धडक दिली. या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या अपघातात २ जणांचा जागीच मृत्यू झाला असून, ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, तळोजा सेक्टर १० परिसरातून जात असताना अचानक कार चालकाचं गाडीवरील नियंत्रण सुटलं. नियंत्रण सुटलेली ही सुसाट कार रस्त्यावरून जाणाऱ्या आणि बाजूला उभ्या असलेल्या लोकांच्या अंगावर गेली. वेग जास्त असल्याने कारने तब्बल ८ ते १० जणांना पाला पाचोळ्याप्रमाणे हवेत उडवलं. ही धडक इतकी भीषण होती की यामध्ये दोघांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

अपघाताची तीव्रता पाहून घटनास्थळावरील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेत ८ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

दुसरीकडे, अपघात घडल्यानंतर मुख्य आरोपी असलेला कारचालक आपली गाडी घटनास्थळावरच सोडून पोलिसांच्या भीतीने फरार झाला आहे. तर या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघातग्रस्त कार ताब्यात घेतली असून फरार चालकाचा शोध घेतला जात आहे.

# महाडीबीटी २.० वर शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया सुरू

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी तातडीने नोंदणी करावी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नव्याने विकसित करण्यात आलेल्या महाडीबीटी २.० प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती व शिक्षण सहाय्य योजनांच्या अर्ज नोंदणीस ६ जुलै २०२६ पासून सुरुवात झाली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरावेत, तसेच महाविद्यालयांनीही प्रलंबित अर्जांवर तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

या प्रणालीद्वारे भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, मॅट्रीकोत्तर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संलग्न वसतिगृहातील व वसतिगृहाबाहेरील विद्यार्थ्यांसाठी निर्वाहभत्ता या योजनांसाठी नवीन (Fresh) तसेच नूतनीकरण (Renewal) अर्ज स्वीकारले जात आहेत.

विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० प्रणालीवर नवीन महाआयडी तयार करणे बंधनकारक असून, स्वतःच्या आधार क्रमांकाचा वापर करूनच नोंदणी करावी लागणार आहे. तसेच आधार पोर्टलवरील पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आणि बँक खात्याची माहिती अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रिका आदी आवश्यक कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात तयार ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. नवीन तसेच नूतनीकरण अर्जांसाठी महाआयडी किंवा आधार लॉगिन आवश्यक असून, पूर्वीचा युजर आयडी किंवा पासवर्ड वापरण्याची गरज राहणार नाही.

महाविद्यालयांसाठीही नवीन कार्यपद्धती लागू करण्यात आली आहे. यानुसार केवळ प्राचार्यांच्या लॉगिनद्वारेच प्रणालीचा वापर करता येणार असून, लिपिक लॉगिन बंद करण्यात आले आहे. मागील युजर आयडी व नव्याने देण्यात आलेल्या डीफॉल्ट पासवर्डद्वारे लॉगिन करून महाविद्यालयाचे प्रोफाइल अद्ययावत करणे तसेच पात्र विद्यार्थ्यांच्या प्रलंबित अर्जांवर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

समाज कल्याण विभागाने स्पष्ट केले आहे की, पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नयेत यासाठी सर्व महाविद्यालयांनी विशेष दक्षता घ्यावी. अर्जांवर वेळेत कार्यवाही न झाल्यामुळे कोणताही मागासवर्गीय पात्र विद्यार्थी लाभापासून वंचित राहिल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना वैयक्तिकरीत्या जबाबदार धरले जाईल.

जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी त्यांच्या संस्थेत प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांची महाडीबीटी २.० प्रणालीवर शिष्यवृत्ती व इतर योजनांसाठी अर्ज नोंदणी करून आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

# मेहकर पोलिसांची धडाकेबाज कारवाई; मोक्कातील अट्टल गुन्हेगार शस्त्रसाठ्यासह जेरबंद

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर। प्रतिनिधी :** मेहकर पोलिसांनी धाडसी पाठलाग करून मोक्का अंतर्गत गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या अट्टल गुन्हेगाराला जेरबंद करत मोठी कारवाई केली. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, एक आरोपी फरार झाला आहे. आरोपींकडून धारदार शस्त्रे, मोबाईल आणि कार असा सुमारे २ लाख ६६ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, रिसोड-सोनाटी मार्गावरून मेहकर बायपासमार्गे लाल रंगाची MH-31-FA-5820 क्रमांकाची कार शहरात येत असून, त्यात रेकॉर्डवरील अट्टल गुन्हेगार प्रवास करत आहेत. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला.

पोलिसांनी वाहनाला थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने वाहन न थांबवता भरधाव वेगाने पळ काढला. त्यानंतर पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करत गणपूर फाट्यानजीक वाहन अडविले. कारमधून तिघे आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना दोन जणांना शिताफीने पकडण्यात यश आले, तर एक आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अमोल परात्या भोसले (रा. बरटाळा) आणि अजय दहीमल भोसले (रा. वरदडा, ता. मेहकर) अशी आहेत. वाहनाच्या झडतीत मोठा धारदार सुरा, दोन चाकू, एक सुरी, ऑटोमॅटिक चाकू, रेडमी मोबाईल आणि डॅटसन रेडी-गो कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासात अमोल भोसले हा मोक्का अंतर्गत कारवाया तसेच खूनाचा प्रयत्न, दरोडा, शस्त्र बाळगणे, मालमत्तेवरील गंभीर गुन्हे अशा विविध स्वरूपाच्या अनेक गुन्ह्यांमध्ये आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. बुलढाणासह नांदेड, लातूर आणि वाशीम जिल्ह्यात त्याच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलिसांच्या मते, पुढील तपासात आणखी गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता आहे.

फरार आरोपीच्या शोधासाठी परतापूर, उकळी आणि सुकळी परिसरात पोलिसांनी कॉम्बिंग ऑपरेशन राबविले असून त्याचा शोध सुरू आहे.



या प्रकरणी मेहकर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५७/२०२६ अन्वये भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४/२५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे आणि सोहन माचरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार यांच्या नेतृत्वाखाली मेहकर पोलीस पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## वृत्तविशेष...

### श्री संत गुलाबबाबा महाराज जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** भारतीय संस्कृतीचे अभ्यासक श्री संत गुलाबबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, जिल्हा नाझर गजानन मोतेकर, नायब तहसीलदार हिवाळे, रविकांत बंगाळ, प्रेम यादव यांनीही श्री. संत गुलाबबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांसाठी सूक्ष्म सिंचनावर ९० टक्के अनुदान; जुलैअखेरपर्यंत विशेष मोहीम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना- प्रति थेंब अधिक पीक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनाचा लाभ मिळावा, यासाठी जिल्ह्यात १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे पात्र शेतकऱ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज प्राप्त करून घेण्याचे नियोजन कृषी विभागाने केले आहे.

या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अल्प व अत्यल्प भूधारक लाभार्थ्यांना मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५ टक्के, तर इतर पात्र शेतकऱ्यांना ३० टक्के पुरक अनुदान देण्यात येणार आहे. उर्वरित १० किंवा १५ टक्के अनुदान अनुक्रमे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना अथवा बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून उपलब्ध होणार असून, एकूण ९० टक्क्यांपर्यंत अनुदानाचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे.

या विशेष मोहिमेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. योजनेविषयी अधिक माहिती तसेच अर्ज प्रक्रियेसंदर्भात संबंधित तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी किंवा सहायक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोषकुमार डाबरे यांनी केले आहे.

### बुलढाण्यासह विदर्भात पुढील आठवडाभर पावसाची शक्यता; नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** भारत मौसम विज्ञान विभाग, प्रादेशिक मौसम केंद्र, नागपूर यांनी जारी केलेल्या हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात दि. ७ व ८ जुलै रोजी सर्वसाधारणपणे ढगाळ वातावरण राहून काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. दि. ९ जुलै रोजी मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज असून त्यानंतर दि. १० ते १३ जुलैदरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत कमाल तापमान ३० ते ३२ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २१ ते २३ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

याचबरोबर विदर्भातील अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ तसेच नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्येही पुढील काही दिवस हलका ते मध्यम पाऊस, काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. काही जिल्ह्यांमध्ये सुरुवातीच्या दोन दिवसांत जोरदार पावसाचीही शक्यता असल्याचे अंदाजात नमूद करण्यात आले आहे.

संभाव्य पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी हवामान विभागाच्या अद्ययावत सूचनांचे पालन करावे. मेघगर्जना व वीजांचा कडकडाट होत असताना उघड्या जागेत थांबणे टाळावे, तसेच आवश्यक असल्यास सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. शेतकऱ्यांनीही हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीची कामे नियोजनपूर्वक करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.